# Weekly Marathi Vocab 29 April to 04 May 2024

**1. जरा**

**अर्थ:** म्हातारपण



- **समानार्थी शब्द:** वृद्धत्व
- **विरुद्धार्थी शब्द:** तारुण्य, तरुणपण
- **वाक्यात उपयोग:** रामराव सध्या आपल्या **जरा** अवस्थेत आहेत.

**2. कांता**

**अर्थ;** बायको



- **समानार्थी शब्द:** पत्नी, सहचारिणी
- **वाक्यात उपयोग:** प्रमिला ही रमेशची **कांता** आहे.

**3. अनघ**

**अर्थ:** निष्पाप



- **समानार्थी शब्द:** भोळा
- **विरुद्धार्थी शब्द:** पापी
- **वाक्यात उपयोग:** लहान मुले **अनघ** असतात.

**4. स्मृती**

**अर्थ:** लक्षात राहणे



- **समानार्थी शब्द:** आठवण
- **विरुद्धार्थी शब्द:** विसर
- **वाक्यात उपयोग:** रामराव आजही आमच्या **स्मृतीत** जिवंत आहेत.

**5. गडणी**

**अर्थ;** सखी



- **समानार्थी शब्द:** मैत्रीण
- **वाक्यात उपयोग:** सीमा ही आशाची खूप चांगली **गडणी** होती.

**6. निंदा**

**अर्थ:** एखाद्या विषयी वाईट बोलणे



- **समानार्थी शब्द:** निर्भर्स्तना
- **विरुद्धार्थी शब्द:** स्तुती
- **वाक्यात उपयोग:** एखाद्याच्या मागे त्याची **निंदा** करणे चुकीचे आहे.

**7. आय**

**अर्थ:** कमाई




- **समानार्थी शब्द:** पगार, वेतन
- **विरुद्धार्थी शब्द:** व्यय, खर्च
- **वाक्यात उपयोग:** उदरनिर्वाहासाठी मनुष्याची **आय** ठीकठाक असणे आवश्यक आहे.

**8. पिछाडी**

**अर्थ;** माघार घेणे



- **समानार्थी शब्द:** पीछेहाट
- **विरुद्धार्थी शब्द:** आघाडी
- **वाक्यात उपयोग:** भारतीय सैन्याला पाहून शत्रू सैन्यानी **पिछाडी** घेतली.

**9. ऱ्हास**

**अर्थ;** अधोगती होणे



- **समानार्थी शब्द:** अधोगती, नुकसान
- **विरुद्धार्थी शब्द:** प्रगती, विकास
- **वाक्यात उपयोग:** प्रदूषणामुळे पर्यावरणाचा **ऱ्हास** होत आहे.

**10. कर्तव्यपराङ्मुख**

**अर्थ:** कर्तव्याकडे पाठ फिरवणारा



- **समानार्थी शब्द:** बेजबाबदार
- **विरुद्धार्थी शब्द:** कर्तव्यपरायण, कर्तव्यदक्ष
- **वाक्यात उपयोग:** रमेश सारखा **कर्तव्यपराङ्मुख** मनुष्य आजवर पाहिला नसेल.

**11. उदयोन्मुख**

**अर्थ;** उदयाला येत असलेला



- **समानार्थी शब्द:** उगवता
- **विरुद्धार्थी शब्द:** मावळता
- **वाक्यात उपयोग:** राजेश हा एक **उदयोन्मुख** कलाकार आहे.

**12. दर्जेदार**

**अर्थ;** उत्कृष्ट दर्जाचे



- **समानार्थी शब्द:** दर्जावान, शालीन
- **विरुद्धार्थी शब्द:** हीन
- **वाक्यात उपयोग:** काही कंपन्या आपल्या ग्राहकांना **दर्जेदार** उत्पादन पुरवतात.

**13. अव्हेर**

**अर्थ:** नाही म्हणणे




- **समानार्थी शब्द:** नकार
- **विरुद्धार्थी शब्द:** स्वीकार
- **वाक्यात उपयोग:** वाईट सवयींचा **अव्हेर** करायला हवा.

**14. सदाचार**

**अर्थ;** चांगली वागणूक



- **समानार्थी शब्द:** सद्वर्तन
- **विरुद्धार्थी शब्द:** दुराचार
- **वाक्यात उपयोग: सदाचार** हा गुण प्रत्येकामध्ये असायला हवा.

**15. तीक्ष्ण**

**अर्थ;** तेज धार असलेला




- **समानार्थी शब्द:** धारदार
- **विरुद्धार्थी शब्द:** बोथट
- **वाक्यात उपयोग:** त्याने **तीक्ष्ण** हत्याराने वार केला.

**16. मौळी**

**अर्थ:** मस्तक



- **समानार्थी शब्द:** शिर, शिखर
- **विरुद्धार्थी शब्द:** तळ, पाया
- **वाक्यात उपयोग:** रमेशच्या **मौळीवर** टिळा लावला होता.

**17. विमोचन**

**अर्थ;** मुक्ती



- **विरुद्धार्थी शब्द:** बंदिस्त, बंद
- **वाक्यात उपयोग:** त्याचे तुरुंगातून **विमोचन** झाले.

**18. विनम्र**

**अर्थ;** नम्र पणे वागणे



- **समानार्थी शब्द:** नम्रता
- **विरुद्धार्थी शब्द:** उद्धटपणा
- **वाक्यात उपयोग:** सर्वांशी **विनम्रपने** वागले पाहिजे.